IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
**UPA NATIONAL E-JOURNAL**
*Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal*
ISSN 2455-4375

# सावित्रीबाई फुले यांचे काव्यविश्व : एक आकलन

**डॉ. बंडु चौधरी**
मराठी विभाग प्रमुख
समर्थ महाविद्यालय, लाखनी
मो. नं ९७६५१९२८७८

आजमितीला मराठी साहित्याचा एकूणच विचार करता विविध प्रवाह, प्रवृत्तीनी नटून मराठी साहित्य २१ व्या शतकात भरभराटीस आल्याचे दिसून येते. त्यात कथा, कादंबरी, प्रवास वर्णन, चरित्र, आत्मचरित्र यासारखे प्रवाह महत्वाचे मानावे लागते. यातीलच महत्वाचा प्रवाह म्हणून कवितेच्या प्रांताकडे पहावे लागते. मराठी साहित्याला कवितेचा प्रांत हा फारसा नखवा नाही तर मुळातच मराठी साहित्याचा मुलाधारच कविता असल्याचे जाणविते. प्राचीन काळात संतानी कवितेच्या जोरावारच मराठी साहित्य जिवंत ठेवले असल्याचे अभ्यासाअंती जाणवते. त्यात कविता प्रवाहाचा २१ व्या शतकात विचार केला तर आजही मोठया प्रमाणात मराठी साहित्याची निर्मितीत कवितेचे योगदान मोठया प्रमाणात असल्याचे दिसते. त्यात ग्रामीण कविता, आंबेडकरवादी कविता, आदिवासी कविता. परंतु या संपुर्ण प्रवाहात मात्र आजही स्त्रीयांची वाणवा जाणवून येते. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधात आंबेडकरवादी कवियत्रीच्या कवितेचे स्वरूप काय ? आंबेडकरवादी कवयित्रीच्या कवितेचे प्रेरणास्थान काय आहेत ? त्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले यांच्या कविता या आंबेडकरवादी कवयित्रीचे प्रेरणास्थान ठरू शकते काय याचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

सावित्रीबाई फुले यांच्या काव्याचा विचार करता त्यांनी आपल्या कवितेची गुंफण १८ व्या शतकात घातली आणि महात्मा फुले यांनी जे समाजकार्याचे होमकुंड पेटविले त्यात प्रावास करित असताना जी जीवनानुभूती आली ते वास्तव कवितेतून मांडण्याचा प्रयत्न सावीत्रीबाई फुले यांनी आपल्या काव्यसंग्रहातून केला. त्यांनी काव्यफुले (१८५४), बावनकशी, सुबोध रत्नाकर, सावित्रीबाईची गाणी, ज्योतीबांची भाषणे यासारखे ग्रंथ व काव्यसंग्रह लिहीले. या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांनी विविधांगी विषय हाताळले. काव्यफुले या काव्यसंग्रहात ४१ स्फुट कविता गुंफुण १२ ओळीची प्रस्तावना जोडली आहे. त्यात ते म्हणतात की, ''मी शब्दांची सुमने काव्यात माळीत असून ती आनंद निर्माण करणारी आहे. शिवाय तिच्या आस्वादाने वाचकांच्या अंतरी शांत रसाची निर्मिती होईल''[१] यासारख्या अभिवचनाने सावित्रीबाई फुले आपल्या काव्यनिर्मितीचा हेतू स्पष्ट करतात.

'काव्यफुले' या काव्यसंग्रहातील कवितेचा वेध घेता पिवळा चापा, जाईचे फुल, जाईची कळी, गुलाबाचे फूल यासारख्या कवितातून ते निसर्गाचे वर्णन करताना दिसतात. तर शिकणेसाठी जाणे व्हा, मनु म्हणे, ब्रम्हपंती शेती, शुद्राचे दुखने, इंग्रजी माउली, शुद्र शब्दांचा अर्थ यासारख्या कवितेतून सामाजिक वास्तव मांडतात. प्रास्ताविका, अर्पणीका या प्रार्थनपर कविता जोतिबांचा बोध ही आत्मपर कविता द्रष्टा कवी ही काव्य निर्मितीवर कविता तेच संत ही बोधपर कविता छत्रपती शिवाजी यासारखी ऐतिहासिक कविता लिहून सावीत्रीबाई फुलेनी आंबेडकरवादी कवियत्रीचे खऱ्या अर्थाने दालन खुले केल्याचे दिसते. प्राचीन काळात सोयराबाई , जनाबाई व त्यांच्या पुढचे पाहूल म्हणून सावित्रीबाई फुले यांच्याकडे पहावे लागते.

सुबोध रत्नाकर हा काव्यसंग्रह १८९१ मध्ये म्हणजेच मा. फुलेच्या मृत्युनंतर प्रकाशित झाला. या काव्यसंग्रहाच्या मुखपृष्ठावर ''वरूडचे शास्त्री बाबा चौधरी, महाजन व मोर्शीचे गोवींदस्वामी काळे यांनी

करजगावचे सत्यशोधक समाजाचे स्वामी लक्ष्मण शास्त्री यांच्या घरी प्रकाशित केले''२ असा अभिप्राय दिला आहे. या काव्यसंग्रहाच्या नावाबृद्दल डॉ. मा. गो. माळी म्हणतात की, ''यामध्ये बावन कडवी असल्याने बावणकशी असे नाव दिले असावे''३ एकुण हा काव्यसंग्रह ५२ कडव्याचा असल्याचे दिसून येते. मुळातच या काव्यरचनेचा हेतू जोतीरावांचा गौरव करणे असा असला तरी त्यातून ते समाज प्रबोधनच करताना दिसतात. त्यात त्यांनी वृत्त योजनेचा वापर करून पंडिती परंपरा जिवंत ठेवल्याचे दिसते. केवळ पंडिती परंपराच जिवंत ठेवीत नाही तर आजमितीच्या आंबेडकरवादी कवयित्रींना एक प्रकारे काव्यात प्रकट होण्याचे कौशल्य सांगून जातात.

आजमितीला आंबेडकरवादी कवियत्रीच्या कवितांचा विचार करता केवळ आंबेडकरांना प्रेरणास्थान मानून आपले दु:ख वेदना त्या काव्यातून व्यक्त करतातना दिसतात. परंतु सावीत्रीबाई फुले आपल्या काव्यातून आपल्या व्यथा वेदना न मांडता सामाजिक चळवळींचा आलेख आपल्या काव्यातून मांडून जातात. एक प्रकारे त्या आपल्या काव्यातून व्यापकतेची भुमीका मांडताना दिसतात. त्यांच्या संपुण काव्यविश्वाचा धांदोळा घेतला तर त्यांनी केवळ एकच विषय न हाताळता विविधांगी विषय हातून एक सपंन्न कवीयत्री म्हणून त्या पुढे आल्याचे दिसते. एकुणच आजमितीला आंबेडकरवादी कवियत्रींची मोठया प्रमाणात आंबेडकरवादी साहित्यात वानवा असताना १८ व्या शतकातील सावीत्रीबाई फुलेंचे काव्य आजही चोखंदळ वाचकांना प्रेरणा देते म्हहणून सामाजिक चळवळींच्या दृष्टीकोणातून सावीत्रीबाई फुले यांची कविता आंबेडकरवादी कवियत्रीचे प्रेरणास्थान मानून आंबेडकरवादी कवियत्रीने वाटचाल करावी असे अभ्यासाअंती मान्य करावे लागते.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. संपा. डॉ. शोभा हनवते — सावित्रीबाई फुले यांची समग्र कविता